पीएच. डी. संशोधन आराखडा

“बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत,
पीएच.डी. (भूगोल) पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या
शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

राठोड बालाजी रतन

एम.ए. एम. फिल.

मार्गदर्शक

डॉ. कळसकर सूर्यकांत नागनाथ

भूगोल विभाग प्रमुख
कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर ग्रामीण महाविद्यालय,
हणेगांव ता. देगलूर जि. नांदेड.

मार्च २०१६

“बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :-

लोकसंख्या भूगोल ही मानवी भूगोलाची एक महत्त्वपूर्ण शाखा आहे. जागतिक पातळीवर निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सर्वप्रथम लोकसंख्या प्रश्नांची सोडवणूक करणे आवश्यक आहे. आधुनिक जगात अनेक प्रश्नांचे मुळ वाढत्या लोकसंख्येत आहे. पर्यावरणीय असमतोल, बेकारी, आरोग्यविषयक सुविधा, निवासाची सुविधा, पाण्याची उपलब्धता तसेच मानवाच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी लोकसंख्या भूगोलाचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे. या प्रश्नाबरोबरच एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लोकसंख्या वाढ हा होय. लोकसंख्या वाढीचा प्रभाव व्यक्ती, समाज आणि राष्ट्रावर पडतो.

लोकसंख्या भूगोल ही १९५० च्या दशकात विकसित झालेली मानवी भूगोलाची विद्याशाखा आहे. दि. २ एप्रिल १९५३ मध्ये अमेरिकन भूगोल तज्ञांच्या परिषदेत आपल्या अध्यक्षीय भाषणात अमेरिकन भूगोल तज्ञ प्रा. जी. टी. त्रिवार्था यांनी लोकसंख्या भूगोलाला मानवी भूगोलाची शाखा म्हणून मान्यता द्यावी असे अवाहन केले. यामुळे लोकसंख्या भूगोलाचा क्रमाक्रमाने विकास सुरू झाला. देशाच्या सांस्कृतिक आणि आर्थिक विकासात लोकसंख्या हा घटक महत्त्वाचा मानला जातो.

अभ्यास क्षेत्र :-

सदरील संशोधनासाठी अभ्यास क्षेत्र म्हणून कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. बिदर जिल्हा कर्नाटक राज्याच्या ईशान्य भागात असून, महाराष्ट्राच्या दक्षिणेस आहे. महाराष्ट्रातील लातूर व नांदेड या दोन जिल्ह्यांची सीमा बिदर जिल्ह्याशी निगडित आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडे तेलंगणा राज्यातील निझामबाद व मेदक जिल्हे आहेत तर पश्चिमेकडे गुलबर्गा जिल्हा आणि दक्षिणेकडे रायचूर जिल्हा आहे.

बिदर जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°४२` उत्तर अक्षवृत्त ते १८°२५` उत्तर अक्षवृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार ७६°४२` पूर्व रेखावृत्त ते ७७°३९` पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. बिदर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ५८५४ चौ. कि.मी. आहे. बिदर जिल्ह्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १७०००५४ आहे. बिदर शहर हे बिदर जिल्ह्याचे मुख्यालय असून मध्ययुगात बरीदशाहीचे राजधानीचे ठिकाण होते तथा पुढील निजामाच्या काळात निजामशाहीतील महत्त्वाचे मुख्यालय होते. वर्तमान काळात बिदर शहरात लोहमार्ग, रस्तेमार्ग आणि वायुमार्गाने अंतरराज्यीय दळणवळण सुविधा आहे. बिदर शहरात भारतीय वायु सेना दलाचे वैमानिक प्रशिक्षण केंद्र आहे.

उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

१) बिदर जिल्ह्यातील प्राकृतिक माहिती मिळविणे.
२) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करणे.
३) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या घनता व वितरणाचा अभ्यास करणे.
४) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या रचनेचा अभ्यास करणे.
५) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येच्या स्थलांतराची कारणे व परिणामाचा अभ्यास करणे.
६) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येच्या आर्थिक व समाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
७) बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येच्या समस्येचा अभ्यास करणे.

आधार सामुग्री :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरुपाच्या आकडेवारीचा वापर करण्यात येणार आहे. ही आकडेवारी बिदर जिल्हा गॅझेटिअर, जिल्हा सांख्यिकीय विभाग, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, सर्वेक्षण, प्रश्नावली, जनगणना अहवाल, मासिके, अप्रकाशित साहित्य, संशोधन पत्रिका इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :-

सदरील संशोधन करण्यासाठी गुणात्मक व संख्यात्मक पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. आवश्यक त्या ठिकाणी सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. आवश्यक तेथे नकाशा, आलेख, आराखडे यांचा वापर करण्यात येणार आहे. संशोधनासाठी खालील सांख्यिकी आणि गणितीय सुत्रांचा वापर करण्यात येणार आहे.

$$१)\ \text{लोकसंख्या घनता} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशातील लोकसंख्या}}{\text{त्या विशिष्ट प्रदेशाचे क्षेत्रफळ चौ. की.मी.}}$$

$$२)\ \text{लोकसंख्या गणितीय घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{त्या प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ चौ. की.मी.}}$$

$$३)\ \text{कृषी घनता} = \frac{\text{एकूण लोकसंख्या}}{\text{त्या प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ चौ. की.मी.}}$$

$$४)\ \text{ढोबळ जन्मदर} = \frac{\text{विशिष्ट प्रदेशात एका वर्षात जन्मलेल्या अर्भकांची संख्या}}{\text{त्याच वर्षाच्या मध्य काळात त्या प्रदेशाची असलेली एकूण लोकसंख्या}} \times १०००$$

$$५)\ \text{सामान्य जन्मदर} = \frac{\text{एकाविशिष्ट वर्षातील एकूण अर्भकांची संख्या}}{\text{त्याच वर्षातील प्रजोत्पादनक्षम वयोगटातील स्त्रीयांची एकूण संख्या}} \times १०००$$

६) ढोबळ मृत्यूदर = (विशिष्ट प्रदेशात एका वर्षातील मृतांची संख्या) / (त्याच वर्षाच्या मध्य काळात त्या प्रदेशाची असलेली एकूण लोकसंख्या) x १०००

७) वयसापेक्ष मृत्यूदर = (विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट वयोगटातील विशिष्ट वर्षातील मृतांची संख्या) / (त्या प्रदेशातील त्याच वयोगटातील त्याच वर्षाच्या मध्यकाळातील लोकसंख्या) x १०००

विषयाची निवड :-

बिदर शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते. हा जिल्हा स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबादच्या निजाम राजवटीत होता. हा जिल्हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागाला लगत असल्याने या जिल्ह्यामध्ये मराठी भाषिकांची संख्या बहुतांश असल्याचे दिसून येते. हा जिल्हा समाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, व्यवसायिक आणि राजकीय या अनेक अंगाने महाराष्ट्राशी साम्य दर्शविणारा आहे. व्यापार आणि व्यावसायिक दृष्टीने या जिल्ह्याचा सीमावर्ती महाराष्ट्राशी दैनंदिन संपर्क असल्याचे दिसून येते. भौगोलिक आणि भाषिक सलगतेमुळे बिदर जिल्ह्यातील लोकसंख्याचा अभ्यास हा एक अर्थाने महाराष्ट्राचा अभ्यास ठरतो. या सर्व वैशिष्ट्यांचा विचार करता कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा संशोधनासाठी निवडणे यथार्थ वाटते.

साहित्याचे पुनरावलोकन :-

कोणत्याही देशाची लोकसंख्या ही गुणात्मक आणि संख्यात्मक दृष्टीने महत्वाची असते. देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक विकासात लोकसंख्या हा घटक महत्त्वाचा असतो. या दृष्टीकोनातून लोकसंख्येचा विविध अंगाने संशोधनात्मक अभ्यास करण्यात आल्याचे दिसून येते. या संशोधनाचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

१) शर्मा बी. आर. (१९७८) :-

शर्मा बी. आर. यांनी छत्तीसगड प्रांतातील लोकसंख्यावाढ व वितरणाचा अभ्यास केला आहे. या संशोधनामध्ये सामान्यपणे कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या ही दर ३० वर्षानी दुप्पट होते. तसेच लोकसंख्या घनता आणि कृषीखालील क्षेत्र यांचा सहसंबंधाचा अभ्यस केला आहे. कृषी विकासाबरोबरच लोकसंख्येमध्ये वाढ होत जाते.

२) चंदना आर. सी व सिध्दू एम. एस. (१९७९) :-

यांनी आपल्या संशोधनामध्ये लिंग गुणोत्तर व त्याला प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला आहे. या संशोधनातुन जन्मदर, मृत्यूदर, स्थलांतर हे घटक लिंग गुणोत्तराला प्रभावित करतात. शिवाय युध्द, दुष्काळ आणि राहणीमान दर्जा हे घटकही लिंग गुणोत्तराला प्रभावित करतात.

३) गुप्ता एम. पी. व शर्मा एस. (१९९४) :-

यांनी मध्यप्रदेशातील लोकसंख्येच्या स्थलातराचा अभ्यास केला आहे. हे संशोधन नागरी आणि ग्रामीण भागातील स्थलांतर अशा दोन भागामध्ये आहे. ग्रामीण भागातील स्थलांतरावर व्यापार, उद्योग, सार्वजनिक सेवा सुविधा, शैक्षणिक सुविधा, नागरीकरण यांचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

४) चव्हाण एम. बी. व सौदाने एम. (२०००) :-

यांनी जन्मदराचा हंगामानुसार अभ्यास केला १९९९ मध्ये प्रत्यक्ष सर्वे करून हा अभ्यास केला आहे. एकूण जन्मदर व प्रत्येक महिन्याचा जन्मदर या आधारे त्यांना असे निष्कर्ष काढले की पावसाळयात म्हणजेच जुलै महिन्यात जन्मदर अधिक असतो तर उन्हाळयात म्हणजेच मार्च मध्ये जन्मदर कमी असतो.

५) बराडे सी. एस. (२००१) :-

यांनी गोव्यातील लोकसंख्या समस्या या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. पोर्तुगालीन फायद्यामुळे व त्यांच्या प्रभावामुळे गोव्यात सर्वांना समान कौटूंबिक फायदा आहे. त्याचा परिणाम लोकसंख्या नियंत्रणाच्या रुपाने झाल्याचे पाहवयास मिळते. गोव्यात विवाहाचे वय

अधिक असल्याने जन्मदर कमी असल्याचे दिसून येते. शिवाय पुर्नविवाहाला बंदी असल्यामुळे जन्मदर कमी होऊन लोकसंख्या कमी आहे.

६) फडके यु. एस. आणि मुखर्जी डी. (२००७) :-

महाराष्ट्रामध्ये १९६१ ते १९९१ या काळातील शहरीकरण व त्याचे परिणाम आणि त्यांचा विकासाचा अभ्यास केला. नागरीकरणाच्या दृष्टीकोनातून ४० वर्षातील नागरी वाटचालीचा आढावा घेतला. याच बरोबर भाषा घटकाला अनुसरून लोकसंख्येचा अभ्यास केला. या संशाधनात्मक अभ्यासावरुन असे दिसून येते की, जेथे उद्योग व व्यावसायाचा विकास अधिक झालेला आहे. तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण अधिक झालेले आहे.

७) पंदुरकर आर. जी. :-

यांनी पुणे जिल्ह्यातील जन्मदर आणि मृत्युदर या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी पुणे विभागातील १९७० ते १९८४ या कालावधीतील जन्मदर व मृत्यूदराच्या संशोधनात्मक अभ्यासातून असे स्पष्ट केले की, शहरी भागामध्ये रोगाचा प्रादुर्भाव व ताणतणावामुळे जन्मदर तसेच स्वास्थ्य प्रभावित झालेले आहे.

प्रकरण मांडणी :-

संशोधनासाठी निवडलेला विषय “बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास” हा असून संबंधित विषयाचे संशोधन करताना एकूण सात प्रकरणाच्या माध्यमातून संशोधन करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

या प्रकरणामध्ये लोकसंख्या भूगोलाचा विकास, लोकसंख्या भूगोलाच्या व्याख्या, महत्त्व, स्वरुप, विषयाची वैशिष्ट्ये, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा, आधार सामुग्री, संशोधन पध्दती. साहित्याचे पुनरालोकन इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- बिदर जिल्ह्याची प्राकृतिक व सांस्कृतिक रचना :-

या प्रकरणात बिदर जिल्ह्याची भौगोलिक माहिती, विस्तार व सीमा, प्राकृतिक रचना, हवामान, जलप्रणाली, मृदा, वनस्पती तसेच समाजिक व आर्थिक या घटकांतर्गत लोकसंख्या, भूमी उपयोजन, कृषी, जलसिंचन, उद्योग, वाहतुक व व्यापार यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे :- बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढ :-

या प्रकरणामध्ये बिदर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये नागरी भागातील लोकसंख्येत झालेली वाढ, ग्रामीण भागातील लोकासंख्येत झालेली वाढ, पुरुष व स्त्रीयांच्या संख्येत झालेली वाढ या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता आणि वितरण :-

या प्रकरणामध्ये लोकसंख्या घनतोचा अर्थ, स्वरुप लोकसंख्येची गणितीय घनता, कृषी घनता, पोषण घनता तसेच लोकसंख्येचे वितरण, लोकसंख्या घनता आणि वितरणाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे :- बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येची संरचना :-

या प्रकरणामध्ये बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येची संरचनेचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामध्ये वयसापेक्ष लोकसंख्या, शैक्षणिक रचना, व्यवसायिक रचना, जन्मदर, मृत्युदर, स्थलांतर या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे :- बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येची आर्थिक व सामाजिक स्थिती :-

या प्रकरणामध्ये बिदर जिल्ह्यातील लोकसंख्येचे आर्थिक व समाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये शहरी भागातील लोकसंख्येची आर्थिक व समाजिक स्थिती आणि ग्रामीण भागातील लोकसंख्येची आर्थिक व समाजिक स्थिती या घटकांचा संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे :- निष्कर्ष व शिफारशी :-

या प्रकरणामध्ये संशोधनावर आधारित निष्कर्ष काढण्यात येणार असून तथा उपयोजनात्मक शिफारशी सुचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१) बिदर जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन २०१२-१३

२) Census of India 2001

३) Triwartha G. T. "A Case for Population Geography" in George J. Demko et.al. 'Population Geography: A Reader, Mc Graw Hill Book co., New York, 1970.

४) Ghosh B.N. 'Fundamental of Population Geography'.

५) Khan Y.S. (1980), Western Maharashtra A study in Population Geography, Ph.D. Thesis, University of Poona, Pune.

६) पंदुरकर आर. जी., पुणे जिल्ह्यातील जन्मदर आणि मृत्युदर, Ph.D. Thesis, University of Poona, Pune.

७) Chandana R. C. 'Geography of Population'.

संशोधक **मार्गदर्शक**

राठोड बालाजी रतन
मु. पो. हणेगाव ता. देगलूर
जि. नांदेड

डॉ. कळसकर सूर्यकांत नागनाथ
भूगोल विभाग प्रमूख
कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर ग्रामीण
महाविद्यालय, हणेगांव ता. देगलूर जि. नांदेड.